माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३४८२

**अपिलार्थी श्री. ॲड. प्रशांत दिवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०८.२०२४ | ०२.०९.२०२४ | १०.०९.२०२४ | २२.१०.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.११.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०२.०९.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.१०.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०३.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "H.R. महाविद्यालयामध्ये कोण- कोणकोणते कोर्स किंवा अभ्यासक्रम शिकवले जातात यासंबंधी माहिती.*
*(२) H.R. महाविद्यालयामध्ये B.Com (बिजनेस मॅनेजमेंट) हा कोर्स शिकवला जातो का व सदर कोर्सला उच्च शिक्षण विभाग किंवा मुंबई विद्यापीठ किंवा HSNC विद्यापीठाची मान्यता आहे का यासंबंधी माहिती.*
*(३) B.Com (बिजनेस मॅनेजमेंट) कोर्ससाठी आपण महाराष्ट्र शासनाच्या किंवा मुंबई विद्यापीठाच्या किंवा HSNC विद्यापीठाच्या घेतलेल्या सर्व परवानगीची छायांकित व साक्षांकित प्रत."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, I would like to clarify that the programs offered by the College can be reviewed on our official website: www.hrcollege.edu. Please note that the College does not offer a program in B.Com (Business Management). Instead, we offer a Bachelor of Management Studies (BMS) program, which is approved by the All India Council for Technical Education (AICTE). As the BMS program is an unaided self-finance course, it falls outside the purview of the Right to Information (RTI) Act, and thus, no information can be provided under the Right To Information Act.

४. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १०.०९.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेली माहिती योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तसेच त्यांचे अधिवक्ता उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती अर्जात नमुद मुद्यांची माहिती देण्यात आलेली नाही.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांनी अपिलार्थींना दि. ०२.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये स्पष्ट माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व महाविद्यालयातील अभ्यासक्रमांची यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच त्यांनी अपिलार्थींना कळविलेले आहे की, महाविद्यालयात B.com असे अभ्यासक्रम राबविले जात नाहीत तर AICT ची मान्यता प्राप्त अभ्यासक्रम राबविले जातात.

७. अपिलार्थी यांनी जरी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असली तरी साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

८. विभिन्न न्यायानिर्णयाप्रमाणे जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती माहिती पुन्हा साक्षांकित करुन माहिती अधिकार अंतर्गत उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही.

९. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**